पालघर व गडचिरोली जिल्ह्यातील जन्म मृत्यु नोंदणी प्रणाली आणि मृत्यू सर्वेक्षण प्रणालीचे बळकटीकरण करण्यासाठी टाटा ट्रस्टसोबत सामंजस्य करार करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१९/१४९/प्र.क्र.३९/कु.क.
१० वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल,
नवीन मंत्रालय,मुबई- ४०० ००१
तारीख: १७ सप्टेंबर २०१९

प्रस्तावना

राज्यात जन्म मृत्यु आणि आरोग्यविषयक माहिती बळकट करण्याचे दृष्टीने, मृत्यूच्या कारणाचे सर्वेक्षण अनेक वर्षांपासुन आरोग्य विभागामार्फत केली जाते. परंतु त्याचे सुयोग्य एकत्रिकरण करुन त्या माहितीचा आरोग्य विषयक धोरण ठरविण्यासाठी वापर करण्याबाबत एक तांत्रिक प्रणाली / शैली विकसीत करण्यासाठी आरोग्य विभाग प्रयत्नशील आहे. या प्रयोजनासाठी सामाजिक कार्यात, विविध क्षेत्रात निपुण भारतातील टाटा ट्रस्ट या संस्थेला प्रायोगिक तत्वावर पालघर व गडचिरोली जिल्हयातील जन्म मृत्यु, आणि मृत्युचे कारणे व त्यासंबंधी माहितीचे संकलन व बळकटीकरण करण्यासाठी एकात्मीक संगणकीय प्रणाली विकसीत करण्यासाठी पथदर्शी प्रकल्प राबविण्याची बाब शासन स्तरावर विचाराधीन होती.

शासन निर्णय

सदर शासन निर्णयानुसार आरोग्य विभागामार्फत सद्यस्थितीत संकलीत करण्यात येणाऱ्या संगणकीय तसेच लिखित विविध प्रकारच्या आरोग्य विषयक माहितीचा अभ्यास करुन सुयोग्य एकत्रिकरण करणे, आरोग्य विषयक विविध पैलू दर्शविणारी माहिती तयार करुन संबंधित जिल्हयाची तसेच गावाची आरोग्य दर्शक चित्र रेखाटनेसाठी टाटा ट्रस्ट ही संस्था गडचिरोली आणि पालघर जिल्ह्यात एक संगणकीय प्रणाली विकसीत करेल. यासाठी संबंधीत जिल्हयातील जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मदतीने सदर संस्था जिल्हा नियंत्रण कक्ष स्थापन करेल. राज्य शासनाने या प्रयोजनार्थ टाटा ट्रस्ट संस्थेशी दिनांक ०८.०२.२०१९ पासून ०७.०२.२०२२ या तीन वर्षाच्या कालावधीसाठीच सामंजस्य करार केलेला आहे. त्यानुसार उक्त प्रकल्प कार्यान्वित करण्याची जबाबदारी संबंधित पक्षकारांवर राहील. या प्रयोजनास्तव

१. टाटा संस्थेमार्फत जिल्हयात संनियत्रण कक्ष स्थापन केला जाईल. तिथुन जन्म व मृत्यु आणि मृत्युची कारणे यासंबंधित आकडेवारी संकलित करुन त्याचा उपयोग माता व बाल संगोपन व इतर आरोग्य कार्यक्रमांस वापरण्यात येईल. संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक सदर कक्षास आवश्यक ती सर्व माहिती उपलब्ध करुन देतील व कक्ष स्थापनेस आवश्यक ते सहकार्य करतील.
२. जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी हे आरोग्य विभागामार्फत संकलित करण्यात येणाऱ्या विविध स्तरावरील माहितीचे अर्थ बोध होईल अशा प्रकारे संग्रहीत करण्यासाठी संस्थेला मार्गदर्शक सहाय्य करतील.
३. जिल्हा आरोग्य अधिकारी आणि जिल्हा शल्य चिकीत्सक यांच्या सहकार्याने विविध प्रशासकीय स्तरावर एकत्रित केलेल्या अहवालातील वर्तमान आकडेवारी ओळखुन ती वेगळी करुन तिचे संकलन करणे. सार्वजनिक आरोग्यविषयक माहिती गोळा करुन अर्थपूर्ण व समग्र अहवाल तयार करणे.
४. गाव, तालुका, जिल्हा पातळीवरील आरोग्यविषयक माहितीसाठी अर्थपूर्ण स्वरूपात अहवाल एकत्रित करण्याच्या दृष्टीने, सध्या संकलीत करण्यात येणाऱ्या विविध डेटा सेट्स आणि सार्वजनिक आरोग्यविषयक माहितीच्या सूचीमधून, सध्या एकाकी असलेले माहितीसंच ओळखुन त्याचे एकत्रिकरण करण्यात यावे, जेणेकरुन सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध धोरणांची तसेच कार्यक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करता येईल.
५. अहवालांच्या अर्थपूर्ण विश्लेषणात्मक निष्कर्षातून महाराष्ट्र शासनाला जनतेच्या आरोग्याचे गुणवत्ता पुर्ण धोरण आखून मोठ्या प्रमाणात लोकांचे जीवन निर्देशांक सुधारण्यास मदत होईल.

२. सदर सांमजस्य करारनुसार सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन आणि टाटा ट्रस्ट यांच्या भुमिकेबाबतचा तपशील सोबतच्या "परिशिष्ट -अ" मध्ये जोडला आहे. गडचिरोली व पालघर जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी सामंजस्य करारातील उद्दीष्टांच्या पुर्तीसाठी टाटा ट्रस्टने नियुक्त केलेल्या सर्व अधिकरी व कर्मचारी यांना सदर प्रकल्प यशस्वी पद्धतीने राबविण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करतील.

३. राज्यातील गेल्या ३ वर्षातील आरोग्य व जीवनविषयक आकडेवारीच्या CRS व SCD प्रणालीवर नोंदणी केलेली माहितीची तातडीने Editable Soft Copy मध्ये टाटा ट्रस्टच्या नामनिर्देशित सल्लागारांना उपलब्ध करण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१७१६१२२६३२१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha Munjaji Bharose

Digitally signed by Varsha Munjaji Bharose
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f3096a175796cc670522c4aff97da20b708981b5122e87c8346c4cc7468f821, serialNumber=1bd844032884bbf2167bc99cd85325223aceef69d02bd455b7ca6972491623e0, cn=Varsha Munjaji Bharose
Date: 2019.09.17 17:13:42 +05'30'

(वर्षा.मुं.भरोसे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. व्यवस्थापकीय संचालक,टाटा ट्रस्ट, बॉम्बे हाऊस, २४, होमीमोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय अभियान संचालक, मुंबइ
३. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पालघर
४. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली
५. संचालक-१/२,आरोग्य सेवा संचालनालय, पुणे
६. उपसंचालक, नागपुर परीमंडळ, नागपुर
७. उपसंचालक,नाशिक परीमंडळ, नाशिक
८. जिल्हा शल्य चिकीत्सक, पालघर
९. जिल्हा शल्य चिकीत्सक, गडचिरोली
१०.जिल्हा आरोग्य अधिकारी, पालघर
११.जिल्हा आरोग्य अधिकारी, गडचिरोली
१२.निवडनस्ती

“जोडपत्र -अ”

(Annexure-A)

Role and Responsibilities of Public Health Department and Tata Trusts for effective implementation of pilot project

Public Health Department

१. Provide all manner of Assistance to Tata Trusts in implementing the said Project including making the requisite Government Resolution(s), passing necessary Order(s), granting permission(s) from various departments and agencies for the smooth functioning of the said projects;

२. Provide such data and in such format as may be required to the input at each stage of the process from application to dashboard;

३. Provide Dedicated Space in the office of DHO/Civil Surgeon for the setting up of the Infrastructure and back office by the Tata Trusts team;

४. Depute the officer(s) to act as coordinator to address and resolve administrative and technical difficulties for smooth implementation of project and further Depute its officials/staff for the implementation of the project and Direct such personal to undergo training as required;

५. Direct District Officers such as District Collectors, CEO, DHO, CS etc. to function in co-ordination with representative of Tata Trusts and to deal with them in a respectful manner and take appropriate action(s) in this regard;

६. Organize meetings respectively with State and District Officers at regular intervals under the chairmanship of ACS/PS, Public Health Department and District Collector/CEO ZP and officials of DMER.

७. Work closely with the Tata Trusts Projects implementation team in the successful execution of the project.

Tata Trusts

१. Ensure the timely completion of the Digitization and overall execution of the various aspects of the Projects;

२. Hire and engage such resources as may be required for the implementation of the project at its own expenses;

३. To provide the technology infrastructure and the physical infrastructure requirements and will work closely with the government in the deployment of the same, and for that purpose procure Computers and related hardware, software and Servers to ensure smooth implementation of the projects;

४. Setup up District Monitoring Center to receive data from pilot area and to assess the same;

५. Impart Training for Medical/Para medical staff etc. Health and Welfare officers of GoM where required as identified by the officer of State/District/Tata Trusts who are currently engaged in data collection processes at various levels, village, sub-centers, PHC, RH/SDH/DH, THO,DHO etc.

६. Incorporate suggestions of the Government in keeping with administrative and legal exigencies, with regard to the general implementation of the project.